परिपत्रक क्र. ७/१९९४.

जा.क्र.राप/कर्मवर्ग/म.वा.सं./१५६६
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई-४०००0८.

दिनांक : २५ मार्च, ९४.

प्रादेशिक व्यवस्थापक,
रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
रा.प. मुंबई/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/रायगड/ठाणे/धुळे/नाशिक/जळगांव/पालघर/पुणे/सोलापूर/कोल्हापूर/सातारा/सांगली/अहमदनगर/औरंगाबाद/नांदेड/बीड/परभणी/उस्मानाबाद/लातूर/जालना/नागपूर/अमरावती/यवतमाळ/अकोला/बुलढाणा/वर्धा/चंद्रपूर/भंडारा/वि.नि.(भांडार) कुर्ला.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/नागपूर/औरंगाबाद.

विषय : सार्वत्रिक निवडणूकी व पोट निवडणूकीबाबत मंत्री महोदयांच्या भेटी व शासकीय वाहनाच्या उपयोगाबाबत सूचना.

...

उपरोक्त विषयासंबंधात शासनातर्फे प्राप्त झालेल्या परिपत्रकांच्या प्रत आपल्या माहितीस्तव आवश्यक कार्यवाहीसाठी या परिपत्रकासोबत पाठविण्यांत येत आहेत. त्यामधील सूचनानुसार पुढील आदेशाप्रमाणे कार्यवाही करावी.

१) राज्य/केंद्र शासनाच्या निवडणूक आयोगाकडून सार्वत्रिक निवडणूकी, पोट निवडणूकीबाबत सदर निवडणूका घेण्यासंबंधी सूचना/प्रसिध्दी वृत्तपत्रात जाहीर होताच प्रसिध्दी दिलेल्या तारखेपासून प्रस्तुत सार्वत्रिक निवडणूका, पोट निवडणूका संपण्याच्या तारखेपावेतो, आपल्या अधिकार कक्षेत असणाऱ्या महामंडळाच्या खात्याच्या (स्टाफ व्हेईकल्स्) उदा. कार, जिप्स्, खात्याचे ट्रक्स, प्रशिक्षण वाहन, ॲम्बूलन्ससहित कुठल्याही वाहनांचा उपयोग निवडणूक प्रचारास, निवडणूकीसाठी प्रवास यासाठी होणार नाही याबाबत कटाक्षाने नोंद घ्यावी.

२) सार्वत्रिक निवडणूक घोषीत केलेल्या मतदार संघात, वा मंत्री महोदयांचे वरिल कालावधीतील दौऱ्या दरम्यान देखील वाहनाचा वापर होणार नाही याची नोंद घ्यावी.

कृ.मा.प.